सहकारातूनसमृध्दीकडे

महाराष्ट्र शासन

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,

**सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय**

५-बी.जे.रोड, नवीन मध्यवर्ती इमारत, पुणे-४११ ००१.

संकेतस्थळ: https://sahakarayukta.maharashtra.gov.in

# प्रसिध्दीपत्रक

सहकार विभागातील गट- क संवर्गातील उच्चश्रेणी लघुलेखक, निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक या पदांची सरळसेवेची रिक्त पदे भरण्याकरिता दि.०६/०७/२०२३ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहिरातीस अनुसरून विहीत मुदतीत अर्ज प्राप्त झालेल्या उमेदवारांची टी.सी.एस.आय.ओ.एन या कंपनीमार्फत दिनांक १६/०८/२०२३ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात आलेली होती. त्यानुसार सदर कंपनीकडून उमेदवारांची विभागनिहाय व पदनिहाय तात्पुरती गुणवत्ता यादी प्राप्त झालेली असून, सदर पदांची तात्पुरती गुणवत्ता यादी दि.०९/०१/२०२४ रोजी सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्रानिमं १२२२/प्र.क्र.५४/का.१३-अ दि.०४/०५/२०२२ नुसार पदांसाठी जे उमेदवार परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) घेणे आवश्यक आहे.

तरी सहकार विभागातील **उच्चश्रेणी लघुलेखक,निम्नश्रेणी लघुलेखक व लघुटंकलेखक** या पदांसाठी परीक्षा दिलेल्या उमेदवारांपैकी ज्या उमेदवारांना परीक्षेत किमान ४५ % गुण प्राप्त आहेत अशा उमेदवारांची **तात्पुरती गुणवत्ता यादी** सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य पुणे या कार्यालयाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१०/०१/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

व्यावसायिक चाचणी घेणेसाठी संबंधित उमेदवार हे मराठी माध्यमातून परिक्षा देणार की इंग्रजी माध्यमातून परिक्षा देणार याबाबतची माहिती सादर करण्यासाठीची लिंक दि.५/०२/२०२४ ते दि.११/०२/२०२४ या कालावधीत सहकार आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली होती. सदर लिंक व्दारे बहुतांश उमेदवारांनी माहिती सादर केली आहे. ज्या उमेदवारांनी लिंकव्दारे माहिती सादर केली नाही, अशा उमेदवारांना संबंधित नियुक्ती प्राधिकारी यांचेमार्फत दुरध्वनीव्दारे तसेच ई-मेल व्दारे संपर्क साधून परिक्षेच्या माध्यमाची माहिती घेण्यात आलेली आहे.

याव्दारे उमेदवारांनी परिक्षा कोणत्या माध्यमातून देणार याबाबत सादर केलेल्या माहितीची विभाग व पदनिहाय यादी सहकार आयुक्त कार्यालयाचे https://sahakarayukta.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

सदर यादीमध्ये शेरा या रकान्यामध्ये सद्यस्थिती नमुद करण्यात आलेली आहे. तरी, परिक्षेच्या माध्यमाचे अनुषंगाने उमेदवारांच्या काही हरकती असल्यास stenoexam2024.coop@gmail.com या ई-मेल आय-डी वर दि.२/०८/२०२४ या दिनांकापर्यंत सादर कराव्यात. तदनंतर प्राप्त हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, कृपया याची नोंद घ्यावी.

**उमेदवारांशी दुरध्वनीव्दारे संपर्क साधला असता ज्यांनी परिक्षा देणार नसल्याचे कळविले आहे किंवा त्यांचेकडे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे कळविले आहे, अशा उमेदवारांना व्यावसायिक चाचणी यादीतून वगळण्यात येईल. तसेच काही उमेदवारांनी लिंक व्दारे माहिती सादर केलेली नाही तसेच दुरध्वनी आणि ई-मेल व्दारेही त्यांचेशी संपर्क झालेला नाही, अशा उमेदवारांनाही व्यावसायिक चाचणी यादीतून वगळण्यात येईल.**

सदर विभागनिहाय यादीतील उमेदवारांची व्यावसायिक चाचणी (Proficiency Test) महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषदेमार्फत साधारणत: ऑगस्ट महिन्याअखेर किंवा सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयात घेण्याचे नियोजित आहे. याबाबतचे वेळापत्रक यथावकाश सहकार आयुक्त कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**स्वाक्षरी/-**
**अप्पर निबंधक (प्रशासन),**
**सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.**

दि.२६/०७/२०२४